विषय : महाराष्ट्र शासन अंगीकृत म्हाडा प्राधिकरणातील महिला कर्मचारी/ अधिकारी यांना "बाल संगोपन रजा" लागू करण्याबाबत

---

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१

जा.क्र. /प्राधि./परिपत्रक/ १८२६/२०१६, दिनांक :- १८/०४/२०१६

---

## परिपत्रक

केंद्र शासनाच्या ज्ञापन क्र.१३०१८/२/२००८, दि.११.९.२००८ ला अनुसरुन, महाराष्ट्र शासन अंगीकृत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सेवेत असलेल्या महिला अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांच्या मुलांप्रती असलेल्या कौटुंबिक जबाबदारीच्या अनुषंगाने आपल्या मुलांचे योग्य संगोपन करुन चांगला समाज घडवून आणण्याची सामाजिक जबाबदारी नीट पार पाडता यावी म्हणून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने, केंद्र शासनाने मंजूर केलेल्या "बाल संगोपन रजे" च्या धर्तीवर म्हाडाच्या सेवेतील महिला अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालामध्ये, १८ वर्षाखालील दोन हयात मुलांच्या संगोपनाकरीता, १ वर्षाच्या (३६५ दिवस )बाल संगोपन रजेस (child care leave) तत्वतः मान्यता दिली आहे.

सद्यस्थितीत म्हाडा प्राधिकरणातील महिला अधिकारी/कर्मचारी यांना प्रति वर्ष ८ नैमित्तीक रजा, १० (२० अर्धवेतनी)वैद्यकीय रजा तसेच ३० दिवसांची अर्जित रजा लागू आहेत. या व्यतिरीक्त १८० दिवस (६ महिने) प्रसुती रजा लागू आहे. या व्यतिरीक्त केंद्र शासनाच्या ज्ञापन क्र.१३०१८/२/२००८, दि.११.९.२००८ ला अनुसरुन, केंद्र शासनाच्या सेवेतील महिला कर्मचाऱ्यांना ७३० दिवसांची (२ वर्षे) विशेष "बाल संगोपन रजा" मंजूर केली आहे. अशाच प्रकारची रजा राज्य शासनाच्या सेवेतील महिला कर्मचाऱ्यांनाही मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तथापि, म्हाडा प्राधिकरण ही एक स्वायत्त संस्था असल्यामुळे, प्राधिकरण स्तरावर केंद्र शासनाच्या ज्ञापन क्र.१३०१८/२/२००८, दि.११.९.२००८ ला अनुसरुन, म्हाडातील महिला अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी एक वर्षाची (३६५ दिवस ) "बाल संगोपन रजा" मंजूर करण्यात येत आहे.

सदर रजा मंजूरीबाबतच्या अटी खालीलप्रमाणे आहेत.

- महिला अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या संपूर्ण सेवा कालावधीमध्ये १८ वर्षाखालील २ हयात मुलांकरीता एक वर्षापर्यंत म्हणजेच ३६५ दिवस दिली जाऊ शकेल.
- सदर रजा मुलांचे संगोपन तसेच आजारपण, परिक्षा इ.करिता अनुज्ञेय राहिल.
- सदर रजा मूल १८ वर्षाचे होईपर्यंत उपभोगता येऊ शकेल.
- सदर रजेच्या कालावधीत महिला कर्मचारी रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी तिला जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच वेतन देणे बंधनकारक राहिल. बाल संगोपन रजा ही एका कॅलेंडर वर्षामध्ये तीन टप्प्यांत उपभोगता येऊ शकेल.
- सदर रजा एका टप्प्यात १५ दिवसांपेक्षा कमी वा ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी अनुज्ञेय रहाणार नाही.
- तसेच ही रजा दत्तक घेतलेल्या मुलांकरीता व शारिरीक/ मानसिक दृष्ट्या अपंग असलेल्या मुलांकरीता देखील मंजूर करण्यात येईल. या ठिकाणी १८ वर्षे वयोमर्यादेची अट रहाणार नाही.
- "बाल संगोपन रजा" ही शासकीय कर्मचाऱ्यांच्या खाती असलेल्या रजेतून वजा करता येणार नाही त्याचप्रमाणे तिसऱ्या अपत्याकरीता सदर रजेचा लाभ घेता येणार नाही. बाल संगोपन रजा ही कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या अर्जित/ परावर्तित (वैद्यकीय)रजेला जोडुन घेता येणे शक्य आहे.
- ज्या महिला कर्मचाऱ्यांचे खाती रजा शिल्लक नसेल अशा कर्मचाऱ्यास बाल संगोपन रजा १ वर्षाच्या कालावधीसाठी केंद्र शासनाच्या नागरी सेवा (रजा) नियमावलीतील नियम ४३-सीच्या उपनियम (३) नुसार मंजूर करता येणे शक्य आहे. तसेच या नियमानुसार सदर रजा एका टप्प्यात १५ दिवसांपेक्षा कमी असू नये व ६ महिन्यांपेक्षा जास्त असू नये.
- सदर रजा ही परिविक्षा कालावधी मध्ये मंजूर केली जाणार नाही.
- सदर रजा ही अर्जित रजेच्या नियमानुसार स्वीकृत करण्यात येईल.
- सदर रजा ही विशेषत्वाने बाल संगोपन, मुलांचे आजारपण, परीक्षा इ. कारणांमुळे दिली जाणार असल्याने, या कालावधीत प्रवासभत्ता देय राहणार नाही.
- मुलांच्या आजारपणाकरीता सदर रजा उपभोगली असता, सक्षम प्राधिकाऱ्यांचे समाधान न झाल्यास आवश्यकतेनुसार, वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे उपभोक्त्यास बंधनकारक राहील.
- सदर परिपत्रकामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/ प्रा.यांना राहतील.

अर्जित रजा/परिवर्तित रजा ही, सबळ कारण असल्याशिवाय मंजूर केली जाणार नाही. रजेचा हक्क सांगून रजा मागीतली जाऊ नये. त्याचप्रमाणे रजेची मागणी केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जर काही, कार्यालयीन कामाची निकड, कामाचे तातडीचे स्वरुप इ.बाबी उपस्थित होत असतील तर अशा वेळी रजा नाकारण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांना आहेत. त्यामुळे उपरोल्लेखीत परिस्थितीत रजा नामंजूर केली जाऊ शकते.

सदर परिपत्रक दि.१ मे २०१६ पासून अंमलात येईल. प्राधिकरणा अंतर्गत सर्व विभागीय मंडळाचे मुख्य अधिकारी तसेच विभाग प्रमुखांनी त्यांचे अधिनस्त सर्व कार्यालये / उपविभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणावयाचे आहे.

**(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**प्राधिकरण यांचे मान्यतेने)**

(डॉ.बी.एन.बास्टेवाड)
सचिव/ प्राधिकरण

**<u>प्रत सस्नेह अग्रेषित :-</u>**

१. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण.
२. मुख्य अधिकारी/ मुंबई मंडळ / मुंबई इ.दु.व पु.मंडळ
३. मुख्य अभियंता-१/ २/ ३/ प्राधिकरण
४. वित्त नियंत्रक / प्रा.
५. विधी सल्लागार/ प्रा.
६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ / प्राधिकरण
८. मुख्य अधिकारी, मुं.झो.सु.मंडळ/ कोकण / पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
९. चौकशी अधिकारी/ प्राधिकरण
१०. सक्षम प्राधिकारी /प्रा.
११. मुख्य जनसंपर्क अधिकारी/ प्रा.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी/प्रा.
१३. संचालक, पीडीसी/ पुणे

**<u>प्रत माहितीसाठी :-</u>**

मा.उपाध्यक्ष/प्रा.यांचे स्वीय सहाय्यक